मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४७० वा • सोमवार, ता. १५ डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००


## महापालिका मतदानापर्यंत रस्ते टिकले तरी धन्य

### १०० कोटींच्या प्रकल्पावर सतेज पाटीलांची टीका

**कोल्हापूर | रयत समाचार**

कोल्हापुरातील १०० कोटी रुपयांच्या रस्ते प्रकल्पाच्या दर्जावरून विधानपरिषदेत काँग्रेसचे गटनेते आमदार सतेज पाटील यांनी तीव्र टीका करत चौकशीची



मागणी केली. ''पुढील पावसाळ्यापर्यंतही हे रस्ते टिकणार नाहीत. महापालिकेच्या मतदानापर्यंत रस्ते टिकले तरी धन्यता मानावी लागेल,'' असा खोचक टोला त्यांनी लगावला.

विधानपरिषदेत बोलताना सतेज पाटील म्हणाले की, या रस्ते प्रकल्पाच्या कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर तक्रारी आहेत. रस्त्यांच्या दर्जावरून न्यायालयात याचिकाही दाखल झाल्या असून, कामावर ताशेरे ओढण्यात आले आहेत. राज्य सरकारने चांगल्या हेतूने १०० कोटींचा निधी मंजूर केला, याबद्दल आभार मानतो; मात्र प्रत्यक्षात ६० कोटींचेही रस्ते तयार झाले नसल्याची परिस्थिती असल्याचा आरोप त्यांनी केला. रस्त्यांची गुणवत्ता तपासण्याची गरज असून या प्रकल्पाची चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली. दरम्यान, सतेज पाटील यांच्या आरोपांनंतर कोल्हापूर उत्तरचे शिंदे सेनेचे आमदार राजेश क्षीरसागर यांनी जोरदार पलटवार केला. ''सतेज पाटील यांना माझं खुलं आव्हान आहे. कुठल्याही मंचावर या सर्व प्रश्नांना उत्तर द्यायला मी तयार आहे,'' असे सांगत त्यांनी पाटलांवर टीका केली. ''आम्ही किती प्रकल्प आणले आणि तुम्ही किती आणले, हे जनतेसमोर मांडूया. पाटील यांनी स्वतःचे उद्योग वाढवले, मात्र शहरासाठी फारसं काही केलं नाही,'' असा आरोपही क्षीरसागर यांनी केला.

> १०० कोटींच्या निधीतून रस्त्यांची कामे सुरू असली तरी पहिल्याच पावसात अनेक ठिकाणी रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. काही रस्त्यांवर सीलकोट पुन्हा करावा लागला असून, अर्धवट आणि निकृष्ट कामांमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

# राज्याच्या इतिहासातील सर्वात मोठी भरती- मुख्यमंत्री फडणवीस

### ५ लाख कोटींची गुंतवणूक; मिहानमध्ये आयटी क्षेत्रातील 'बिग-६'

**नागपूर | रयत समाचार**

राज्यात झालेल्या एकूण १५ लाख ७२ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीपैकी तब्बल ५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक एकट्या विदर्भात झाली असून, हा भाग उद्योग आणि रोजगाराच्या दृष्टीने वेगाने पुढे जात असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. हिवाळी अधिवेशनाच्या अंतिम आठवड्यातील चर्चे दरम्यान त्यांनी ही माहिती मांडली.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सामंजस्य करार केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात अमलात आणले जात आहेत. देशात झालेल्या एकूण गुंतवणुकीपैकी ३१ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. विदर्भातील गडचिरोली हा भाग आता गुंतवणुकीचे नवे केंद्र बनत असून, तेथे सर्वाधिक गुंतवणूक येत आहे.

नागपूरच्या मिहान प्रकल्पात सध्या ३१ कंपन्या कार्यरत असून आणखी २२ कंपन्या लवकरच सुरू होत आहेत. आयटी क्षेत्रातील देशातील 'बिग-६' कंपन्यांची उपस्थिती मिहानमध्ये असल्याने मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होत आहे. मिहानमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या सुमारे १ लाख २७ हजारांहून अधिक लोकांना रोजगार मिळणार असून, नागपूर विमानतळाच्या विस्ताराचे कामही सुरू असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

अवकाश व संरक्षण साहित्य निर्मिती क्षेत्रात २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून त्यातून १५ ते २० हजार रोजगार निर्माण होणार आहेत. सोलर ऊर्जा मॉडेलमध्ये विदर्भ देशात प्रथम क्रमांकावर येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. इलेक्ट्रिक वाहन निर्मितीसाठी छत्रपती संभाजीनगर आणि मराठवाड्यात ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून त्यातून ५० ते ६० हजार रोजगार उपलब्ध होणार आहेत.

> गेल्या तीन वर्षांत राज्य सरकारने १ लाख २० हजार तरुणांना सरकारी नोकऱ्या दिल्या आहेत. पुढील दोन वर्षांतही तेवढ्याच नोकऱ्या देण्यात येणार असून, ही महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात मोठी भरती ठरेल.
>
> **- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

## दिल्लीतील वादग्रस्त घोषणांमागे भाजपचाच हात- नाना पटोले



**नागपूर | रयत समाचार**

दिल्लीतील 'व्होट चोर, गद्दी छोड' या आंदोलनादरम्यान लागलेल्या वादग्रस्त घोषणांमागे भाजपच्या कार्यकर्त्यांचाच हात असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. भाजपकडून जाणीवपूर्वक कट रचून अशा घोषणा दिल्या जात असून, त्यातून राजकीय वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे पटोले यांनी स्पष्ट केले. ''स्वतःच शिव्या घालून घेऊन त्यावर राजकारण करण्याची पद्धत केवळ 'नॉन-बायोलॉजिकल माणूस' असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदीच करू शकतात,'' अशी बोचरी टीकाही नाना पटोले यांनी यावेळी केली. यापूर्वी बिहारमध्ये राहुल गांधी यांच्या सभेत पंतप्रधानांच्या आईविषयी अपशब्द वापरणारा व्यक्ती भाजपशी संबंधित असल्याचे उघड झाले होते, असेही त्यांनी सांगितले दिल्लीतील रामलीला मैदानावर काँग्रेसने 'व्होट चोरी'च्या मुद्द्यावर भव्य रॅलीचे आयोजन केले असून, या रॅलीत राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, प्रियंका गांधी वाड्रा यांच्यासह पक्षाचे अनेक ज्येष्ठ नेते सहभागी झाले आहेत. निवडणूक प्रक्रियेत कथित हेराफेरी आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेविरोधात काँग्रेसने आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे. नाना पटोले म्हणाले की, काँग्रेसची भूमिका स्पष्ट असून ''व्होट चोर, गद्दी छोड'' हीच आमची राजकीय घोषणा आहे आणि तीच पुढेही कायम राहणार आहे. भाजप आणि निवडणूक आयोग लोकशाही कमकुवत करत असल्याचा आरोप करत काँग्रेसने जनआंदोलनाच्या माध्यमातून संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## गायधनी, डॉ. सावरकर ग्रीकच्या फरसाला साहित्य अकादमीवर

### कवी, विचारवंत प्रा.डॉ. यान्नीस नेतृत्वाखाली अकादमी





**पणजी | रयत समाचार**

ग्रीक देशातील ऐतिहासिक नगरी फरसाला येथे आंतरराष्ट्रीय स्तरावरील ॲकॅडेमी ऑफ फरसाला या साहित्यिक व सांस्कृतिक समितीची स्थापना करण्यात आली आहे. जागतिक कीर्तीचे ग्रीक कवी व विचारवंत प्रा. डॉ. यान्नीस फिकास यांच्या नेतृत्वाखाली ही अकादमी स्थापन झाली असून डॉ. फिकास यांनी विविध देशांतील नामवंत साहित्यिक, समीक्षक, कवी, पत्रकार, संगीतकार व प्रकाशक यांची सन्मानीय सदस्य म्हणून निवड केली आहे.

या आंतरराष्ट्रीय अकादमीत भारतातून एकूण पाच सदस्यांची निवड करण्यात आली असून त्यामध्ये मराठी साहित्यक्षेत्रातील महाकवी सुधाकर गायधनी आणि साहित्यिक व प्रकाशिका डॉ. मंजूषा सावरकर यांचा समावेश आहे. ही बाब मराठी साहित्याच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील गौरवाची मानली जात आहे.

डॉ. मंजूषा सावरकर यांच्या कुसुमाई या आंतरराष्ट्रीय प्रकाशन संस्थेकडून महाकवी सुधाकर गायधनी यांच्या देवदूत या महाकाव्याची आंतरराष्ट्रीय इंग्रजी आवृत्ती प्रकाशित करण्यात आली आहे. या ग्रंथाची ग्रीस, अल्बानिया, रोमानिया, इंग्लंड आणि इटली येथील विविध मासिकांत सखोल समीक्षा प्रसिद्ध झाली असून या माध्यमातून मराठी साहित्याचे जागतिक स्तरावर कौतुक झाले आहे.

सुधाकर गायधनी आणि डॉ. मंजूषा सावरकर यांची ॲकॅडेमी ऑफ फरसालाच्या सन्मानीय सदस्यपदी निवड होणे हा अभिजात मराठी भाषेचा व साहित्याचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील गौरव असल्याचे साहित्यवर्तुळातून व्यक्त होत आहे.

## क्रिकेटच्या पंढरीत फुटबॉलचा देव

**मुंबई | रयत समाचार**

अर्जेंटिनाला विश्वविजेतेपद मिळवून देणारा जगप्रसिद्ध फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर असून, दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी तो मुंबईत दाखल झाला. मुंबईतील वानखेडे स्टेडियममध्ये मेस्सीचे चाहत्यांकडून जल्लोषात स्वागत करण्यात आले. मेस्सीची एक झलक पाहण्यासाठी स्टेडियम परिसरात प्रचंड गर्दी झाली होती. सायंकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास मेस्सी वानखेडे स्टेडियममध्ये दाखल होताच 'मेस्सी मेस्सी'च्या जयघोषाने परिसर दणाणून गेला. क्रिकेटची पंढरी मानल्या जाणाऱ्या वानखेडेत फुटबॉलच्या दिग्गजाचे आगमन होताच चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी भारताचा दिग्गज फुटबॉलपटू सुनील छेत्री याच्याशी मेस्सीने भेट घेतली. दोघांनी एकमेकांची मिठी मारत शुभेच्छा दिल्या.

यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि लिओनेल मेस्सी यांच्या हस्ते राज्य सरकारच्या 'प्रोजेक्ट महादेवा' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी मेस्सीचा सन्मान करत त्याला स्मृतिचिन्ह प्रदान केले.

## मराठी व्यक्ती प्रधानमंत्री होण्याचा पृथ्वीराज चव्हाणांचा दावा

### १९ डिसेंबरला सत्ताबदल?



**मुंबई | रयत समाचार**

देशाच्या राजकारणात येत्या १९ डिसेंबरला मोठा बदल घडण्याची शक्यता असून भारताचा पंतप्रधान बदलू शकतो आणि तो मराठी व्यक्ती असू शकतो, असा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. विशेष म्हणजे हा पंतप्रधान भाजपचाच असू शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पिंपरी-चिंचवड येथे 'जनगणमन' या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर माध्यमांशी बोलताना चव्हाण यांनी हे भाकीत व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, सध्या आंतरराष्ट्रीय पातळीवर घडणाऱ्या घडामोडींचे पडसाद भारताच्या राजकारणावरही उमटू शकतात.

यावेळी त्यांनी अमेरिकेतील घडामोडींचा संदर्भ देत सांगितले की, एका मोठ्या स्टिंग ऑपरेशनमधून अनेक दिग्गजांची नावे समोर येण्याची शक्यता आहे. या प्रकरणाशी संबंधित माहिती येत्या १९ डिसेंबरला जाहीर होऊ शकते, असा दावा त्यांनी केला. या घडामोडींमुळे अमेरिकेत मोठी राजकीय उलथापालथ होऊ शकते आणि त्याचे परिणाम आंतरराष्ट्रीय राजकारणावरही दिसू शकतात, असे चव्हाण म्हणाले.

या संभाव्य बदलांचा परिणाम भारतावरही होऊ शकतो, असा अंदाज व्यक्त करताना चव्हाण यांनी स्पष्ट केले की, जर भारतात पंतप्रधान बदलला, तरी काँग्रेसचा पंतप्रधान होणार नाही, कारण सध्या काँग्रेसकडे बहुमत नाही.

याआधीही चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत बोलताना आंतरराष्ट्रीय घडामोडी, विशेषतः अमेरिकेतील एपस्टाईन प्रकरण आणि त्यासंबंधित कागदपत्रांचा उल्लेख केला होता. ही माहिती पूर्णपणे सार्वजनिक झाल्यास त्याचे पडसाद भारताच्या राजकारणातही उमटू शकतात, असे त्यांनी सांगितले होते.

एकूणच, येत्या १९ डिसेंबरकडे देशाचे लक्ष लागले असून, चव्हाण यांच्या या भाकितामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

### नगर अर्बन बँक घोटाळा

## फॉरेंसिक ऑडिटवर गंभीर प्रश्नचिन्ह, बँक बचाव समिती आक्रमक

### शासनाच्या विश्वासाचा भंग असल्याचा गंभीर आरोप

**अहमदनगर | रयत समाचार**

नगर अर्बन बँकेतील २९१ कोटी रूपयांपेक्षा जास्त रकमेच्या आर्थिक घोटाळ्याच्या चौकशीत नेमण्यात आलेल्या फॉरेंसिक ऑडीटरच्या कामकाजावर गंभीर आक्षेप घेतले जात आहेत. फॉरेंसिक ऑडिटचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे अपहार झालेली रक्कम नेमकी कुठे, कशी आणि कोणाच्या माध्यमातून गेली याचा सखोल मागोवा घेणे, ज्याला 'मनी ट्रेल' म्हटले जाते तसेच आरोपींच्या खात्यांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त रोख रकमेचे व्यवहार झाले आहेत का, याचा तपशीलवार तपास करणे अपेक्षित असते.

मात्र नगर अर्बन बँक प्रकरणात नेमलेल्या फॉरेंसिक ऑडीटरने या मूलभूत बाबींवर अपेक्षित लक्ष न देता, फिर्यादीला आरोपी कसे करता येईल तसेच बँकेतील भ्रष्टाचाराविरोधात ठाम भूमिका घेणाऱ्या व्यक्तींना कशा प्रकारे अडकवता येईल, यावरच अधिक भर दिल्याचा आरोप बँक बचाव समितीचे प्रमुख शिलेदार राजेंद्र गांधी यांच्याकडून करण्यात आला.

बँक बचाव समितीने दावा केला आहे की, फॉरेंसिक ऑडिटरने जाणीवपूर्वक अनेक महत्त्वाच्या बाबी दुर्लक्षित केल्या असून, त्या लपविलेल्या मुद्द्यांचा अभ्यास करून समिती आता तपासी अधिकारी आणि माननीय न्यायालयाच्या निदर्शनास ही बाब आणून देत आहे. यासोबतच या प्रकरणाकडे



माननीय मुख्यमंत्री यांचेही लक्ष वेधण्यात आले असल्याचे सांगण्यात आले. फॉरेंसिक ऑडिटरकडून जाणीवपूर्वक चुकीचे काम होणे म्हणजे शासनाच्या विश्वासाचा भंग असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.

दरम्यान, घोटाळ्यातील आरोपींना अपहाराच्या रकमेच्या जोरावर कोणालाही 'खरेदी' करता येईल, बनावट कागदपत्रे तयार करता येतील आणि कोणालाही खोट्या गुन्ह्यात अडकवता येईल, असा भ्रम असल्याचेही बँक बचाव समितीचे म्हणणे आहे. मात्र, समिती अभ्यासपूर्ण आणि ठोस पुराव्यांच्या आधारे काम करत असून, कितीही प्रयत्न झाले तरी सत्य बाहेर येणारच, असा ठाम विश्वास व्यक्त करण्यात आला.

> बँक बचाव समितीने ठामपणे जाहीर केले आहे की नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांना त्यांचे १०० टक्के पैसे परत मिळवून दिले जातील, बँकेला झालेल्या सर्व नुकसानीची वसुली करण्यात येईल आणि बँक पुन्हा कार्यान्वित केली जाईल. ''कितीही ताकद लावा, शेवटी सत्याचाच विजय होईल,'' असा निर्धार समितीने व्यक्त केला आहे.

## समता पतसंस्थेवर गंभीर आरोप

### चौकशी : ४० कोटींची जमीन ५ कोटींना?

**कोपरगाव | रयत समाचार**

राज्यातील अग्रगण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समता नागरी सहकारी पतसंस्थेवर मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराचे गंभीर आरोप झाल्याने सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे. ४० कोटी रुपयांची जमीन अवघ्या ५ कोटी रुपयांना परस्पर विकल्याचा आरोप झाल्यानंतर सहकार आयुक्तांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत येथील कर्जदार वसंत घोडके यांनी याबाबत तक्रार दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून पतसंस्थेच्या संचालकांसह एकूण सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासोबतच कर्जदार संजय मोरे, ओमप्रकाश खके आणि वसंत घोडके यांनी केलेल्या स्वतंत्र तक्रारीनंतर सहकार विभागाने चौकशीची प्रक्रिया सुरू केली आहे.

समता नागरी पतसंस्थेच्या राज्यभरात ३० शाखा असून १,१०० कोटी रुपयांहून अधिक ठेवी असल्याची माहिती आहे. मात्र, या आरोपांमुळे ठेवीदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. चौकशीचे आदेश मिळाल्याने संस्थेच्या अडचणी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, संस्थेचे चेअरमन संदीप कोयटे यांनी सर्व आरोप फेटाळून लावत, हे आरोप राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा दावा केला आहे. संस्थेचे संस्थापक काकासाहेब कोयटे हे कोपरगाव नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवत असल्याने, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संस्थेची बदनामी करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. चौकशीला पूर्ण सहकार्य करू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

> समता पतसंस्थेच्या संचालकांवर दाखल झालेले गुन्हे आणि सहकार विभागाने सुरू केलेली चौकशी यामुळे कोपरगावमधील राजकीय वातावरण तापले असून, येत्या पालिका निवडणुकीत हा मुद्दा केंद्रस्थानी राहणार, हे स्पष्ट झाले आहे.

## मोडी लिपी संवर्धनासाठी मोफत प्रशिक्षण वर्गांचे आयोजन

**मुंबई | गुरुदत्त वाकदेकर**

मराठी संस्कृतीचा ऐतिहासिक अभिमान असलेल्या मोडी लिपीच्या संवर्धन, पुनरुज्जीवन आणि प्रसाराच्या उद्देशाने श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि शिवस्वराज्य प्रबोधिनी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने मोडी लिपी मोफत शिकवणी वर्ग आयोजित करण्यात आले आहेत.

हे प्रशिक्षण वर्ग ११ जानेवारी २०२६ पासून सुरू होणार असून, एकूण १० रविवार हे वर्ग घेतले जाणार आहेत.असून, वर्गांचे स्थळ दादर येथे असणार आहे.

या मोफत प्रशिक्षणात मोडी लिपीची मूलभूत ओळख, अक्षररचना व लेखनपद्धती, प्राथमिक वाचनलेखन प्रशिक्षण यासोबतच सराव आणि वैयक्तिक मार्गदर्शन देण्यात येणार आहे. अनुभवी मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष लेखनाचा सखोल सराव करून घेतला जाणार असून, मोडी लिपीचा इतिहास व तिची पार्श्वभूमी यांची माहितीही दिली जाणार आहे. यामुळे सहभागी विद्यार्थ्यांना मराठीच्या प्राचीन दस्तऐवजांशी थेट परिचयाची सुरुवात होणार आहे.

मोडी लिपी शिकणे म्हणजे आपल्या वैभवशाली इतिहासातील बखरी, राजपत्रे, दस्तऐवज व शिलालेखांशी थेट नातं जुळवण्याची दुर्मिळ आणि अमूल्य संधी आहे. ही लिपी पुन्हा जिवंत ठेवणे आणि तिचा मौल्यवान वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे मत आयोजकांनी व्यक्त केले आहे.

या मोफत प्रशिक्षण वर्गाच्या अधिक माहितीसाठी सर्व इच्छुकांनी शिवस्वराज्य प्रबोधिनी प्रतिष्ठानच्या संचालिका वनिता साळुंखे ९७०२२०८२११ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# पिंपळगाव माळवी येथे महाबीज तूर 'गोदावरी'चे पीक प्रात्यक्षिक

## कृषी विभाग व महाबीजचा संयुक्त उपक्रम

**नगर तालुका । रयत समाचार**

पिंपळगाव माळवी येथे महाबीज तूर 'गोदावरी' वाणाच्या पीक प्रात्यक्षिक कार्यक्रमास वरिष्ठ अधिकारी, कृषी तज्ज्ञ तसेच कार्यक्रमातील कृषिकन्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला

कृषी विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज), अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपळगाव माळवी येथील प्रगतशील शेतकरी प्रताप झिने यांच्या शेतावर महाबीज तूर 'गोदावरी' वाणाच्या पीक प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे होते.




प्रमुख पाहुणे म्हणून राजाभाऊ मोराळे (विभागीय व्यवस्थापक, महाबीज जालना), दत्तात्रय डमाळे (उपविभागीय कृषी अधिकारी, अहमदनगर), प्रदीप लाटे (प्रकल्प समन्वयक, आत्मा), सुनील दौंड (जिल्हा व्यवस्थापक, महाबीज), नितीन दानवले (प्रमुख शास्त्रज्ञ, राहुरी) तसेच अशोक वाळके (तालुका कृषी अधिकारी) उपस्थित होते. यावेळी रविंद्र काळभोर, विजय सोमवंशी, माधवी घोरपडे, योगेश घोलप यांच्यासह प्रगतशील शेतकरी प्रताप झिने यांचीही उपस्थिती होती.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्नित डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचालित कृषी महाविद्यालय, विळदघाट येथील कृषिकन्या अश्विनी मुळे, साक्षी मुठे, मानसी निमसे, प्रतीक्षा राऊत, साक्षी रोडे व किरण सावंतफुले यांनी प्राचार्य प्रा. डॉ. सोमेश्वर राऊत, प्रा. किरण दांगडे व प्रा. पूनम ठोबरे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमात सहभाग नोंदवला. यावेळी कृषिकन्यांनी शेतकऱ्यांना 'महाविस्तार ए आय' ॲपविषयी मार्गदर्शन केले. कृषी विभागामार्फत विकसित करण्यात आलेले हे आधुनिक डिजिटल व्यासपीठ शेतकऱ्यांना हवामान अंदाज, बाजारभाव, तांत्रिक सल्ला व विविध कृषी सेवा एका ठिकाणी उपलब्ध करून देत असून, यामुळे शेतकऱ्यांची उत्पादनक्षमता व निर्णयक्षमता वाढण्यास मदत होणार असल्याचे सांगण्यात आले.

# मनपा वेशीची दुर्दशा

## प्रशासकांचे दुर्लक्ष चव्हाट्यावर!

### इमारतीसह वेस व सुरक्षा कंपाऊंड तात्काळ दुरुस्त करण्याची मागणी

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर शहराच्या ऐतिहासिक वारशाची साक्ष देणाऱ्या जुन्या महानगरपालिका इमारतीच्या वेशीची दयनीय अवस्था सध्या नागरिकांच्या रोषाचा विषय ठरत आहे. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली ही वेस, मुख्य इमारत तसेच सुरक्षा कंपाऊंड मोठ्या प्रमाणावर जीर्ण झाले असून, प्रशासक यशवंत डांगे यांचे याकडे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक व इतिहासप्रेमींनी केला आहे.

वर्षानुवर्षे कोणतीही दुरुस्ती न झाल्याने वेशीवर मोठ्या प्रमाणावर झाडाझुडपांची वाढ झाली आहे. ठिकठिकाणी प्लास्टर गळून पडले असून विटा उघड्या पडलेल्या दिसत आहेत. यामुळे ही वेस केवळ विद्रूपच दिसत नाही, तर नागरिकांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्यात किंवा जोरदार वाऱ्याच्या वेळी कोणताही भाग कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. येथून मनपा कर्मचारी, शाळेचे विद्यार्थी यांची मोठी रहदारी असते, अपघाताचा धोका झाल्यास जबाबदारी कोणाची ?



यासंदर्भात नागरिकांनी महापालिका प्रशासनाकडे मुख्य इमारत, सुरक्षा कंपाऊंड आणि ऐतिहासिक वेस यांची तात्काळ दुरुस्ती व संवर्धन करण्याची मागणी केली आहे. अन्यथा, या प्रश्नावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. शहराचा इतिहास जपायचा की तो हळूहळू नष्ट होऊ द्यायचा, हा प्रश्न आता प्रशासनासमोर उभा आहे.

ही इमारत व वेस केवळ प्रशासकीय नव्हे तर शहराच्या ऐतिहासिक ओळखीचा महत्त्वाचा भाग आहे. येथील मनपा कौन्सिल हॉल गौरवाची बाब होती. मात्र सध्याच्या प्रशासकीय व्यवस्थेला या वारशाचे कोणतेही भान उरलेले नाही. ''शहरातील सौंदर्यीकरणाच्या नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च केले जातात, पण खऱ्या ऐतिहासिक वास्तू मात्र दुर्लक्षित राहतात.

# नवीन वर्गखोल्यांमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण आनंददायी होईल- दादासाहेब पाटील

**नगर तालुका । भगवान राऊत**

सन फार्मा कंपनीच्या सीएसआर निधीतून तालुक्यातील आगडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस दोन नवीन वर्गखोल्या बांधून देण्यात आल्याने येथील विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक आनंददायी होईल. या वर्गखोल्यांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमधून उद्या चांगले अधिकारी घडतील, असे प्रतिपादन सन फार्मा इंडस्ट्रीज लिमिटेडचे एचआर हेड दादासाहेब पाटील यांनी केले.

आगडगाव ग्रामस्थांच्या दीर्घकालीन मागणीनंतर सन फार्मा कंपनीच्या सीएसआर निधीतून व नवजीवन प्रतिष्ठानच्या समन्वयाने आगडगावच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस दोन नवीन वर्गखोल्या बांधून देण्यात आल्या असून संपूर्ण शाळा सौर ऊर्जेखाली आणण्यात आली आहे. या नवीन वर्गखोल्या व सौर ऊर्जा प्रकल्पाच्या लोकार्पण सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी सन फार्मा कंपनीचे सीएसआर हेड सोमनाथ दडस, नवजीवन ग्रामोदय प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार, आगडगावचे सरपंच परमेश्वर पालवे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शिवाजी कराळे, माजी उपसरपंच संतोष शिरसाठ, प्रल्हाद खाडे, वैभव कराळे, नगर तालुका पंचायत समितीचे विस्तार अधिकारी चंद्रकांत खाडे, गटशिक्षण अधिकारी कापरे, संजय धामणे, आगडगाव सोसायटीचे चेअरमन एकनाथ पालवे, सदस्य यशवंत कराळे, वाघुले



सर, नवजीवन प्रतिष्ठानचे सुदीप पडवळ, दिपक बत्तीशे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सन फार्मा कंपनीचे सीएसआर हेड सोमनाथ दडस यांनी सांगितले की, आगडगावला मोठा धार्मिक वारसा लाभलेला आहे. अशा वातावरणात जीर्ण झालेल्या जुन्या वर्गखोल्यांच्या जागी नवीन वर्गखोल्या सन फार्मा कंपनीने आपल्या सीएसआर निधीतून बांधून दिल्याने ही शाळा आगामी काळात गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे केंद्र ठरेल. कंपनीने दाखवलेल्या विश्वासाला येथील शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ निश्चितच सार्थ ठरवतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नवीन वास्तूचे उद्घाटन व सौर ऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला नवीन वर्गखोल्या व सौर ऊर्जा प्रकल्प मिळाल्याने आगडगाव ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत सन फार्मा कंपनी व नवजीवन प्रतिष्ठानचे आभार मानले.

# नामस्मरण हे भक्तिमार्गाचे मुख्य साधन- हभप डॉ. घोटणकर

## गोंदवलेकर महाराज पुण्यतिथी साजरी

**अहमदनगर । विजय मते**

ज्ञानमार्ग असो वा भक्तिमार्ग, खरा ''मी कोण आहे'' हे ओळखण्यासाठीच सर्व साधना असतात. पुण्यपर्व काळातील पुण्यतिथी साधनेसाठी महत्त्वाची असून भक्तांना योग्य मार्ग दाखविण्यासाठीच संतांनी देहधारण केली, असे प्रतिपादन हभप डॉ. अनिकेत घोटणकर महाराज यांनी केले. सावेडी उपनगरातील शिलाविहार परिसरात असलेल्या श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात पुण्यतिथीनिमित्त आयोजित प्रवचनात ते बोलत होते.

गोंदवलेकर महाराजांनी आपल्या जीवनातून नामस्मरणाचे महत्त्व विशद केले असून ''मी रामरायाचा दूत आहे, करता-करविता सर्व श्रीरामच आहेत'' हे त्यांनी आचरणातून दाखवून दिले, असे डॉ. घोटणकर महाराज म्हणाले. अखंड रामनाम जपातून आत्मशांती, सदाचार व भक्तिभाव दृढ होतो, असेही



त्यांनी स्पष्ट केले.

पुण्यतिथीनिमित्त पहाटे रुद्राभिषेक, प्रवचन व पहाटे ५.५५ वाजता फुले-गुलाल उधळून पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी हभप सुंदरदास रिंगणे महाराज व हभप रेखा रिंगणे यांनीही प्रवचन केले.

दुपारी महाआरती व महाप्रसादाने सोहळ्याची सांगता झाली. कार्यक्रमासाठी ब्रह्मचैतन्य सेवाभावी मंडळाने परिश्रम घेतले असून भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वामी विवेकानंद विद्यालयात वृक्षारोपणाने वाढदिवस साजरा



**नगर तालुका । रयत समाचार**

नवनागापूर येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात श्री गजानन विद्या प्रसारक मंडळाचे संस्थापक तसेच नवनागापूर ग्रामपंचायतीचे सरपंच डॉ. बबनराव डोंगरे यांचा वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. बबनराव डोंगरे म्हणाले की, स्वामी विवेकानंद विद्यालय हे एक कुटुंब असून एमआयडीसी परिसरातील गरीब कामगारांचे विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भवितव्य घडविणे हीच आमची प्राथमिकता असून या कार्यात आमची संस्था कधीही कमी पडणार नाही, असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सत्यभामा शिंदे यांनी केले.

यावेळी शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले तसेच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका हौसाबाई कोतकर यांनी केले.

# लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे जयंतीनिमित्त मुंडे प्रतिष्ठानच्यावतीने रक्तदान शिबीर

**पाथर्डी । नरहरी शहाणे**

लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त मुंगुसवाडे (ता. पाथर्डी) येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात गावातील नवदाम्पत्य आदिनाथ व संस्कृती यांनी सहकुटुंब उपस्थित राहून, लग्नाच्या अभूषणात देवदर्शनापूर्वी रक्तदान करत समाजाला प्रेरणादायी संदेश दिला.

हे रक्तदान शिबिर लोकनेते गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने मुंगुसवाडे गावचे माजी सरपंच आबासाहेब खेडकर,




मार्गदर्शक राजेंद्र खेडकर, तसेच ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी कार्यरत उचल फाउंडेशनचे कार्यकर्ते सचिन खेडकर, सोमनाथ खेडकर आणि गावातील मित्रपरिवार यांच्या संयुक्त पुढाकारातून आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला गावातील तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विशेष म्हणजे नुकतेच विवाहबद्ध झालेले आदिनाथ खेडकर व त्यांचे बंधू देवदर्शनासाठी निघण्यापूर्वी रक्तदान करून या सामाजिक उपक्रमात सहभागी झाले. आयुष्यातील अत्यंत पवित्र क्षणीही केलेल्या या रक्तदानाचे पंचक्रोशीत सर्वत्र कौतुक होत आहे. लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांना रक्तदानाच्या माध्यमातून दिलेले हे अनोखे अभिवादन उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरले. समाजासाठी जेवढे शक्य होईल तेवढे विधायक कार्य करत राहण्याचा निर्धार यावेळी नवदाम्पत्याने व्यक्त केला. यावेळी साई सेवा ब्लड बँकचे संचालक अजित जगताप यांनी स्वतः उपस्थित राहून सर्व रक्तदात्यांसह नवदाम्पत्याचा विशेष गौरव केला व सर्वांचे आभार मानले.

## शहरात वाहतूक कोंडी

**अहमदनगर । रयत समाचार**

शहरातील प्रमुख चौक व बाजारपेठ परिसरात वाढती वाहतूक कोंडी ही नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. अरुंद रस्ते, रस्त्यांवर उभ्या असलेल्या वाहनांची गर्दी आणि वाढती वाहनसंख्या यामुळे सकाळ व सायंकाळच्या वेळेत मोठी अडचण निर्माण होत आहे.

दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक
गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे
ख्रिसमस विशेषांक
अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात
अतिथी संपादक
सॅम्युअल वाघमारे
8788412780
संपादक
भैरवनाथ वाकळे
8805401800
रयत समाचार महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक
जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक
भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४

रयत समाचार Classified छोटी जाहिरात
छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद
खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# गावरान कांद्याची लागवड जोमात

## खर्च, मजूर टंचाई व बाजारभावामुळे शेतकरी चिंतेत

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

पारंपरिक गावरान कांदा व ऊस लागवडीचा हंगाम सध्या जोमात सुरू असला तरी शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरची चिंता काही कमी होताना दिसत नाही. गुलाबी कांद्याच्या तुलनेत यंदा गावरान कांद्याची लागवड मोठ्या प्रमाणात सुरू आहे. मात्र उत्पादन खर्चात झालेली प्रचंड वाढ, वाढते मजुरीचे दर आणि रोपांची कमतरता यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे.



एकरी १२ ते १३ हजार रुपयांपर्यंत पोहोचलेला मजुरीचा खर्च, रोटरिंगपासून वाफे तयार करण्यापर्यंतची तांत्रिक कामे आणि त्यासाठी लागणाऱ्या मजुरांची टंचाई यामुळे शेतकऱ्यांवरील ताण अधिकच वाढला आहे. अनेक शेतकऱ्यांना तालुक्याबाहेरून मजूर बोलवून लागवड पूर्ण करावी लागत असल्याने खर्चात भर पडत आहे.

यंदाही अनेक शेतकरी उसनवारी, कर्जे तसेच दागदागिने तारण ठेवून कांदा पिकाची लागवड करत आहेत. मात्र गेल्या वर्षी चांगला भाव मिळेल या अपेक्षेने साठवून ठेवलेला कांदा बाजारभावाअभावी खराब झाला. त्यामुळे यंदाच्या हंगामाबाबत शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

कुकडी, घोड, कॅनॉल तसेच भीमा नदी पट्ट्यातील शेतकऱ्यांनी द्राक्ष, डाळिंब, लिंबू, ऊस, मका, हरभरा, ज्वारी व गहू यांसह गावरान कांद्याची लागवड सुरू केली आहे. चालू वर्षी पावसाने चांगली साथ दिली असली तरी बियाणे, खते व औषधांच्या वाढलेल्या किमती शेतीसाठी मोठे आव्हान ठरत आहेत. पीक पिकवणे शेतकऱ्यांच्या हातात असले तरी बाजारभाव मात्र त्यांच्या हाताबाहेरच असल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत. शेती हा उपजीविकेचा प्रमुख आधार असला तरी वाढता खर्च व अनिश्चित बाजारभाव यामुळे शेतकऱ्यांचा संयम कसोटीला लागला आहे. तरीही ''पर्याय नाही'' या वास्तवाला सामोरे जात शेतकरी अपेक्षांच्या ओझ्याखाली गावरान कांद्याची लागवड करत असल्याचे चित्र तालुक्यात दिसत आहे.

> घुगलवडगाव येथील कांदा उत्पादक शेतकरी सतीश पाडळे व बाळू चव्हाण यांची व्यथा हीच परिस्थिती अधोरेखित करते. ''कांदा पिकवणे आमच्या हातात आहे, पण बाजारभाव नाही. गेल्या वर्षी गावरान कांदा भाव न मिळाल्याने सडून गेला. यंदा तरी आमचे पीक वाया जाऊ नये, हीच अपेक्षा आहे,'' अशी भावना त्यांनी व्यक्त केली. बाजारभावाबाबत केंद्र व राज्य सरकारकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत असून अनेक शेतकरी तुलनेने स्थिर उत्पन्न देणाऱ्या उसाकडे वळत असल्याचेही दिसून येत आहे.

# श्रीरामपूर हेच जिल्हा मुख्यालयासाठी योग्य ठिकाण– आ. हेमंत ओगले

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात आमदार हेमंत ओगले यांनी अहिल्यानगर जिल्ह्याच्या विभाजनाचा प्रश्न उपस्थित करत श्रीरामपूर जिल्हा घोषित करावा, अशी ठाम मागणी विधानसभेत केली.



सभागृहात बोलताना आओगले म्हणाले की, अहिल्यानगर हा भौगोलिक दृष्ट्या राज्यातील सर्वात मोठ्या जिल्ह्यांपैकी एक असून जिल्ह्याचे विभाजन होणे अत्यावश्यक आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचा विचार करता श्रीरामपूर हेच जिल्हा मुख्यालयासाठी सर्वाधिक योग्य ठिकाण आहे. श्रीरामपूरमध्ये अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, नगररचना कार्यालय यांसह अनेक महत्त्वाची शासकीय कार्यालये कार्यरत आहेत.

तसेच जिल्हा मुख्यालयासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व मूलभूत सुविधा श्रीरामपूरमध्ये उपलब्ध असून शेती महामंडळाच्या जागा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. श्रीरामपूर जिल्हा व्हावा, ही मागणी जुनी असून त्याला ऐतिहासिक व प्रशासकीय आधार आहे. त्यामुळे श्रीरामपूर हेच जिल्हा मुख्यालयासाठी योग्य ठिकाण असल्याचे आ. ओगले यांनी मांडले. विधानसभा निवडणुकीनंतर पहिल्या दिवसापासूनच आ. हेमंत ओगले श्रीरामपूर जिल्हा निर्मितीसाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. जेव्हा जेव्हा संधी मिळेल, त्या त्या सर्व ठिकाणी आ. ओगले हे श्रीरामपूर जिल्ह्याची मागणी लावून धरत असल्याचे दिसून येत आहे.

# पुढे रस्ता, मागे खड्डा! निकृष्ट कामाला कंटाळून बनकर यांचे आमरण उपोषण सुरू



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

गव्हाणवाडी फाटा बेलवंडी श्रीगोंदा हा अत्यंत महत्त्वाचा मार्ग सध्या सुरू असलेल्या सिमेंट काँक्रीटीकरणाच्या निकृष्ट कामामुळे चर्चेत आला आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासन व ठेकेदारांकडून दुर्लक्ष होत असल्याने अखेर सामाजिक कार्यकर्ते अनिल बनकर यांनी गुरुवार, ता. ११ पासून आमरण उपोषणाला सुरुवात केली असून उपोषणाचा आज चौथा दिवस आहे.

या रस्त्यावर गेल्या काही दिवसांपासून काँक्रीटीकरणासोबतच अर्धवट पुलांची कामे, ठिकठिकाणी पडलेले खडडे आणि उघडी खडी यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक वेळा कार्यकारी अभियंत्याकडे तक्रारी करूनही ठेकेदारांनी दखल घेतली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. परिणामी या मार्गावर अपघातांची मालिका सुरूच असल्याचेही सांगण्यात येत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, ''पुढे रस्ता मागे खड्डा'' अशी अवस्था या मार्गाची झाली आहे. काही ठिकाणी रस्त्याखालील खडी उघडी पडली असून दर्जेदार पाणी न वापरल्याने काँक्रीटच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. तक्रारी केल्यावर प्रशासनाकडून ''काही होणार नाही'' किंवा ''इतकीच काळजी असेल तर स्वतःच्या पैशाने इंजिनिअर ठेवा'' अशा अवमानकारक प्रतिक्रिया मिळत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

रस्त्याच्या देखरेखीची जबाबदारी ठेकेदाराकडे देण्यात आली असताना काम सुरू असतानाच अशी अवस्था असल्याने भविष्यात देखरेख कशी होणार, असा थेट सवाल जनतेतून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, उपोषणाच्या चौथ्या दिवशीही प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेण्यात आलेली नाही. अनिल बनकर यांची तब्येत खालावत चालली असून सामाजिक प्रश्नासाठी एक कार्यकर्ता आमरण उपोषणाला बसूनही चार दिवस उलटून दखल न घेतली जाणे ही अत्यंत खेदाची बाब असल्याची चर्चा जनसामान्यांमध्ये सुरू आहे.

रस्त्याच्या कामाची तात्काळ चौकशी करून दोषींवर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते अनिल बनकर यांनी केली आहे.

# समता इंटरनॅशनल स्कूलच्या स्वाती कोयटे यांना 'टाइम्स ऑफ इंडिया'चा पुरस्कार

**कोपरगाव । किसन पवार**

शैक्षणिक गुणवत्ता, नियोजनबद्ध प्रशासन तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत द टाइम्स ऑफ इंडिया आणि द स्टार एज्युकेशन अवॉर्ड्स २०२५ यांच्या संयुक्त विद्यमाने समता इंटरनॅशनल स्कूलच्या कार्यकारी विश्वस्त स्वाती संदीप कोयटे यांना ''दि बेस्ट मॅनेजमेंट इन इंटरनॅशनल स्कूल महाराष्ट्र'' हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.



या पुरस्कारामुळे समता इंटरनॅशनल स्कूलच्या शैक्षणिक व प्रशासकीय व्यवस्थापन पद्धतीला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. स्वाती कोयटे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत गुणवत्तापूर्ण, मूल्याधारित व विद्यार्थीकेंद्रित शिक्षणपद्धती प्रभावीपणे राबवली जात आहे. संस्थेचे संस्थापक ओमप्रकाश कोयटे यांच्या दूरदृष्टीपूर्ण शैक्षणिक संकल्पना व सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे शाळेने अल्पावधीतच महाराष्ट्रासह राष्ट्रीय स्तरावर आपले वेगळेपण सिद्ध केले आहे.

शाळेच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाचे नियोजन प्राचार्य समीर आत्तार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे

पुरस्कार स्वीकारल्यानंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना स्वाती कोयटे म्हणाल्या, ''हा सन्मान माझा वैयक्तिक नसून समता इंटरनॅशनल स्कूलमधील प्रत्येक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांचा आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून त्यांना भविष्यासाठी सक्षम बनवणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे.''

या मानाच्या पुरस्कारामुळे शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून समता इंटरनॅशनल स्कूलवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कर्जत आगाराच्या बसचे मोहटादेवी गडावर उत्साहात स्वागत

**पाथर्डी । नितीन गटाणी**

कर्जत (रायगड) आगारातून श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थानासाठी सुरू करण्यात आलेल्या विशेष एसटी बस सेवेचे श्रीक्षेत्र मोहटादेवी मंदिराच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. या उपक्रमामुळे कर्जत, कामोठे, वाशी, मुंबई परिसर तसेच पुणे व आसपासच्या भागातील भाविकांसाठी श्रीक्षेत्र मोहटादेवी आणि श्रीक्षेत्र मढी येथील कानिफनाथ महाराजांच्या दर्शनासाठी थेट व सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध झाली आहे. सदर बस कर्जत येथून सकाळी



६.३० वाजता रवाना होऊन सायंकाळी ५.३० वाजता मोहटादेवी गडावर पोहोचते. रात्री बस गडावर मुक्कामी राहून दुसऱ्या दिवशी सकाळी साडेसात वाजता कर्जतकडे रवाना होऊन सायंकाळी साडेसहा वाजता पोहोचते. गर्भगिरी डोंगर पट्ट्यातील अनेक नागरिक कर्जत, कामोठे, वाशी व मुंबई महानगर परिसरात उद्योग व रोजगारासाठी स्थलांतरित झाल्याने या बस सेवेचा त्यांना मोठा लाभ होणार आहे. साध्या दरात उपलब्ध असलेल्या या बस सेवेत विविध सवलती, पुशबॅक सीट व मोबाईल चार्जिंगसारख्या सुविधा देण्यात आल्याने प्रवाशांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. श्रीमोहटादेवी देवस्थान विश्वस्त मंडळाच्या वतीने विश्वस्त बाबासाहेब रघुनाथ दहिफळे व श्रीकांत लाहोटी यांच्या हस्ते एसटी बसची विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी बस चालक अजीम पठाण व वाहक आशीर पठाण यांचा देवस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच कर्जत आगाराचे अधिकारी व कर्मचारी यांचेही आभार व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमास देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, ग्रामस्थ, कर्मचारी तसेच भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बस सेवेचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमोहटादेवी देवस्थानचे जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे यांनी केले.

# गुलालाची सर्वत्र उत्सुकता

## उमेदवारही सरसावले

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

बहुचर्चित आणि उत्सुकता शिगेला पोहोचलेल्या श्रीरामपूर नगरपालिकेसह राज्यभरातील नगरपालिकेच्या गुलालाची उमेदवारांसह मतदारांना उत्सुकता लागली आहे. निवडणूक लढवणारे उमेदवारही या गुलालासाठी आता पुढे सरसावले आहेत.

मतदानाची कमी टक्केवारी, लांबलेली मतमोजणी आणि काय होणार अशी उत्सुकता आता उमेदवारांसह प्रत्येक मतदाराला लागली आहे. बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची महायुती सरकार विरोधातील सर्व पक्षांची मागणी चर्चेत असताना झालेली निवडणूक सर्वांच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाची मानली जात आहे.

निवडणुकीत काही चमत्कार होतो का हे पाहण्यासाठी आता केवळ आठच दिवस उरले आहेत. क्षण न क्षण प्रत्येक जण मतमोजणीसाठी




आतुरलेला दिसत आहे. सगळ्याच पक्षांची राज्यभरात उडालेली शकले कुठे युती तर कुठे आमने-सामने तर कुठे मिली भगत अशा प्रकारे ही निवडणूक लढवली गेली.

कुणालाच कुणाचा थांग पत्ता नाही अशा प्रकारे झालेली ही निवडणूक केवळ सोपस्कार पार पाडावेत अशी झाली आहे.

मतदानाची कमी झालेली टक्केवारी म्हणजे सर्वसामान्य जनता आणि मतदारांचा लोकशाही वरील उडालेल्या विश्वासाचे प्रतीक मानले जात आहे. लांबलेल्या निवडणुकीमुळे सर्वांच्याच आशा निराशेत पाहायला मिळाल्या. उमेदवार आणि नेत्यांनी देखील आलिया भोगासी असावे सादर अशा प्रकारे ही निवडणूक लढवली.

मतदारांची प्रचंड निराशा हे या निवडणुकीचे खास वैशिष्ट्य मानले जात आहे. मतदानापासून अलिप्त राहून अनेकांनी लोकशाही वरील आपला राग व्यक्त केला आहे. अशी मतदारांमध्ये चर्चा आहे. आता बस झाले, अशाही विचारात असलेल्या काही उमेदवारांनी निवडणुकीचे मैदान सोडले. तर काहींनी मीच पाहिजे अशा प्रकारे निवडणूक लढवली. नवखे उमेदवार मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर मतदारांची झालेली हेळसांड आणि अवहेलना हे या निवडणुकीतील सर्वात मोठी वाईट अशी घटना होती. वेगवेगळ्या पक्षांच्या उमेदवारांसह अपक्षांनी देखील ही निवडणूक प्रतिष्ठेची करत लढवली. सर्वच पक्षांनी आपापले उमेदवार उभे करून या निवडणुकीची रया घालविली.ना जाहीरनामा न वचननामा फक्त एकमेकांच्या उखाळ्या पाखळ्या काढत ही निवडणूक उमेदवारांसह नेत्यांनी पार केली. प्राथमिक गरजा आणि समस्या शहरात आ वासून उभ्या असताना सर्वच पक्षाच्या नेत्यांनी या संदर्भात अवाक्षरही काढले नाही याबाबत मतदारांमध्ये प्रचंड नाराजी आहे. प्रोटोकॉल म्हणून काही मतदारांनी मतदान केले. मात्र त्यांची नाराजी लपलेली नाही. मतमोजणीला आता अवघे आठच दिवस उरले असून श्रीरामपूरच्या सिंहसनावर कोण आरूढ होणार यासाठी मतमोजणी होऊ द्यावी लागणार आहे.

# केंद्रस्तरीय स्पर्धेत हिवरगाव पावसा शाळेच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

चंदनापुरी येथे झालेल्या केंद्रस्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिवरगाव पावसा येथील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. या स्पर्धेत एकूण तेरा शाळांनी सहभाग घेतला होता. हिवरगाव पावसा येथील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत यश मिळवले. हस्ताक्षर स्पर्धेत किलबिल गट (इयत्ता पहिली व दुसरी) मध्ये स्वराज्य विकास गडाख याने प्रथम क्रमांक पटकावला. वक्तृत्व स्पर्धेत किलबिल गटात सबुरी काशिनाथ पावसे हिने द्वितीय क्रमांक मिळवला, तर बालगट (इयत्ता तिसरी व चौथी) मध्ये धनश्री रामनाथ पावसे हिने प्रथम क्रमांक मिळवला. वेशभूषेनुसार सादरीकरण स्पर्धेत बालगटात अद्विक अजित गडाख याने तृतीय क्रमांक पटकावला. सांस्कृतिक कार्यक्रम व समूहगीत गायन स्पर्धेत बालगट (इयत्ता पहिली ते चौथी) मध्ये शाळेने द्वितीय क्रमांक मिळवला. वैयक्तिक गीत गायन स्पर्धेत किलबिल गटात भक्ती दत्तात्रय पावसे हिने प्रथम क्रमांक मिळवला, तर बालगटात वैष्णवी आदिनाथ वाकचौरे हिने प्रथम क्रमांक पटकावला. गोष्टकथा सादरीकरण स्पर्धेत बालगटात तनिष्का शरद पावसे हिने तृतीय क्रमांक मिळवून शाळेच्या यशात भर घातली. या सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक आर. पी. राहणे तसेच शिक्षक अक्षय खतोडे, हरिभाऊ सहाने व मीनल बिडवे यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीच्यावतीने अभिनंदन करण्यात आले.

## किस्से निवडणुकीचे...

**सलीमखान पठाण**

### आता स्वीकृत नगरसेवक पदाचे डोहाळे

श्रीरामपूर नगरपालिका निवडणुकीत १७ प्रभागांतून ३४ नगरसेवक निवडून येणार आहेत. त्यानंतर दहा नगरसेवकांमागे एक स्वीकृत नगरसेवक या सूत्रानुसार पालिकेत तीन किंवा चार स्वीकृत नगरसेवकांची निवड होणार आहे. त्यामुळे आतापासूनच या पदासाठी इच्छुकांनी जोरदार हालचाली सुरू केल्याचे चित्र आहे. कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळण्याची शक्यता नसल्याने कोणत्या पक्षाचे किती नगरसेवक निवडून येतात, यावर स्वीकृत नगरसेवकांचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. निवडणुकीपूर्वी सर्वच पक्षांमध्ये इच्छुकांची मोठी गर्दी होती. त्यामुळे अनेक पक्षनेत्यांनी तिकीट न मिळालेल्या इच्छुकांना स्वीकृत नगरसेवक पदाचे आश्वासन दिले आहे. मात्र दिलेले आश्वासन प्रत्यक्षात पाळले जाईल का, याबाबत साशंकता आहे. कारण मागील अनुभव पाहता हे आश्वासन पाळणे किती कठीण आहे, याची जाणीव सर्वांनाच आहे. मागील वेळी अनेक इच्छुकांना निवडणुकीपासून परावृत्त करण्यासाठी प्रत्येक प्रभागात दहा-दहा जणांना स्वीकृत नगरसेवक पदाचा शब्द देण्यात आला होता. प्रत्यक्षात मात्र मोजक्यांनाच संधी मिळाली आणि अनेक जण वंचित राहिले. त्या नाराजीची सल आजही काही कार्यकर्त्यांच्या मनात आहे. यावेळीही ज्यांना स्वीकृत नगरसेवक पदाचा शब्द देण्यात आला आहे, तो सहजासहजी पाळला जाईल, असे वाटत नाही. कारण या पदासाठी मोठ्या प्रमाणावर घोडेबाजार होण्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. निवडून येणारे नगरसेवक पक्षाचा आदेश कितपत पाळतील, याबाबतही प्रश्नचिन्ह आहे. मागील निवडणुकीनंतर तीन जणांची स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड झाली होती. त्यावेळी समाज प्रतिनिधित्वाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल झाल्याची चर्चा आजही ऐकू येते. दहा नगरसेवकांमागे एक स्वीकृत नगरसेवक या सूत्रानुसार सुमारे ५० लाख रुपयांचा खर्च झाल्याची चर्चा होती. आता महागाई वाढल्याने यावेळी हा आकडा थेट एक कोटी रुपयांपर्यंत जाईल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. पूर्वी स्वीकृत नगरसेवक निवडताना पक्षनिष्ठा, सामाजिक कार्य, जनसेवा यासारख्या बाबी विचारात घेतल्या जात होत्या. मात्र सध्या 'जो देईल जास्त दाम, त्याला मिळेल मान' अशीच परिस्थिती निर्माण झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी व भाजप या तिन्ही पक्षांत स्वीकृत नगरसेवक पदासाठी इच्छुकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे साम, दाम, दंड, भेद या सर्व मार्गांचा वापर सुरू असून अखेर कोणाच्या गळ्यात स्वीकृत नगरसेवक पदाची माळ पडते, यासाठी आता २१ तारखेच्या निकालाचीच प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल

भारताचे पहिले उपप्रधानमंत्री, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज ७५वी पुण्यतिथी. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले.

त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. वकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती. त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले.

१९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला. त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले. त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले.

त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली.

बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना विनम्र अभिवादन!

# माळीवाडा वेशीवरचे संकट टळले

## जनक्षोभानंतर माघार, प्रशासक डांगेकडून पाडकाम रद्द

**अहमदनगर । रयत समाचार**

ऐतिहासिक अहमदनगर तथा गौरवशाली अहिल्यानगर शहराच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष असलेल्या माळीवाडा वेशीला पाडण्याच्या प्रस्तावामुळे निर्माण झालेल्या तीव्र जनक्षोभाची अखेर महानगरपालिकेने माघार घेतली आहे. वेस पाडकाम रद्दबाबतचे पत्र आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी प्रसिद्धीस दिले.

मनपाने दैनिक नवा मराठा व दैनिक समाचारमध्ये १३ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्धीस दिलेल्या हरकती, सूचना व नागरिकांच्या प्रतिक्रिया लक्षात घेऊन हा निर्णय घेतल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले आहे. ''नागरिकांच्या जनभावना व लोकहित लक्षात घेऊन सदर कार्यवाही सध्या रद्द ठेवण्यात येत आहे,'' असे यशवंत डांगे यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, माळीवाडा वेशीच्या संरक्षणासाठी शहरातील अहमदनगर इतिहासप्रेमी मंडळ, ज्येष्ठ पत्रकार भुषण देशमुख, मनसेचे इंजि. विनेद काकडे, घरघर लंगर सेवाचे हरजितसिंह वधवा आणि सहकारी, ॲड. श्याम आसावा, मराठा सेवा संघाचे इंजि. अभिजीत वाघ, असिफखान दुलेखान, भाजपाचे ऋषिकेश आगरकर, राष्ट्रवादीचे माजी महापौर अभिषेक कळमकर आणि सहकारी, शिवसेनेचे संभाजी कदम, पत्रकार प्रियांका शेळके, रसिक गृपचे जयंत येलुलकर आणि सहकारी, नितीन भुतारे, माळीवाडा परिसरातील सुजाण नागरिक, इमानदार तरूण मंडळे तसेच शहर, जिल्हा व राज्यभरातील नगरकर व विविध इतिहास जाणिवेचे नागरिक तसेच शहरातील जाणते पत्रकार सक्रिय झाले असून, त्यांनी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (एएसआय), अहमदनगर उपमंडळाचे संवर्धन सहाय्यक



एच.जे. दसरे यांना मागणीपत्र सादर केले आहे. या निवेदनात माळीवाडा वेशीचे तातडीने संरक्षण करावे आणि महापालिका प्रशासक यशवंत डांगे यांच्या पाडकामविषयक भूमिकेवर हरकत घ्यावी, अशी मागणी करण्यात आली होती. महानगरपालिकेने पाडकामासंदर्भातील नोटीस नवा मराठा दैनिकात प्रसिद्ध केल्यानंतर शहरात संतापाची लाट उसळली होती. याच पार्श्वभूमीवर आता महापालिकेने कार्यवाही रद्द केल्याचे जाहीर केले असले, तरी माळीवाडा वेशीच्या भवितव्याबाबतची अनिश्चितता कायम आहे. यावर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी होत

इतिहासप्रेमी मंडळाने २०१८ मधील दिल्लीगेट वेस प्रकरणाचा संदर्भ देत सांगितले की, तेव्हा देखील अशाच पद्धतीने पाडकामाचा डाव आखण्यात आला होता; मात्र इतिहासप्रेमी नागरिक आणि एएसआयच्या हस्तक्षेपामुळे ती वेस वाचविण्यात यश आले. ''माळीवाडा वेस बाबतीतही एएसआयने पुढाकार घेऊन आवश्यक असल्यास न्यायालयात जावे,'' अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे.

अहमदनगरच्या इतिहासाचा जिवंत पुरावा असलेली माळीवाडा वेस वाचवण्यासाठी नागरिकांची एकजूट अधिक दृढ झाली असून, महानगरपालिका आणि एएसआय पुढे नेमकी काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

> ऐतिहासिक अहमदनगर व गौरवशाली अहिल्यानगरच्या इतिहासाचा प्राण असलेली माळीवाडा वेस जिच्या कुशीत महात्मा फुले यांचा पुतळा पिढ्यानपिढ्या उभा आहे ती पाडण्याचा प्रयत्न बाहेरगावाहून आलेल्या काही अधिकाऱ्यांच्या पुढाकारातून होत आहे. ''ज्यांना शहराच्या इतिहासाशी काहीही देणेघेणे नाही, तेच अधिकारी या ठेव्यावर घाला घालत आहेत,''

# खाकऱ्याच्या चवीतून लाखोंची उलाढाल

## 'लखपती दीदी' प्रियंका बेरड यांची यशस्वी भरारी



**दरेवाडी । शफीक बागवान**

ग्रामीण भागातील महिलांना केवळ चूल आणि मूल या चौकटीत न पाहता, त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाचा उमेद (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) एक दीपस्तंभ ठरला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील दरेवाडी येथील प्रियंका राजेंद्र बेरड यांचा प्रवास याच अभियानाच्या यशाची साक्ष देणारा आहे. एका सामान्य गृहिणीने जिद्द, कष्ट आणि शासनाच्या योजनेची सांगड घालत उभ्या केलेल्या खाकरा व्यवसायाची ही प्रेरणादायी यशकथा आहे.

बेरड कुटुंबात खाकरा बनवण्याचा व्यवसाय पिढ्यानपिढ्या चालत आलेला होता. प्रियंका बेरड यांचे सासरे अत्यंत कष्टाने हा व्यवसाय सांभाळत होते; मात्र, तो केवळ घरगुती स्वरूपाचा होता. प्रियंका यांच्या मनात या वडिलोपार्जित कलेला आधुनिकतेची जोड देत एका 'ब्रँड'मध्ये रूपांतरित करण्याची इच्छा होती, परंतु योग्य मार्गदर्शनाअभावी त्यांना दिशा मिळत नव्हती. मात्र उमेद अभियानामुळे त्यांच्या स्वप्नांना नवी दिशा मिळाली.

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत त्यांना ३ लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाले, तसेच बीज भांडवल योजनेतून ४ लाख रुपयांचे सहाय्य मिळाले.

आज त्यांच्याकडे अत्याधुनिक पॅकेजिंग आणि स्वच्छतेचे निकष पाळून ६ विविध प्रकारचे खाकरे बनवले जातात. विशेष म्हणजे, ज्या गुजरात राज्याची ओळख खाकरा हा मुख्य पदार्थ म्हणून आहे, तिथेही मेड इन अहिल्यानगर खाकऱ्याला मोठी मागणी आहे.

केवळ स्वतःचा विकास न साधता, गावातील इतर महिलांनाही त्यांनी सक्षम केले आहे. आज त्यांच्या युनिटमध्ये ९ ते १० स्थानिक महिलांना दररोज रोजगार मिळतो, ज्यातून त्यांना दिवसाला ३०० रुपये उत्पन्न मिळते. दररोज ३० ते ४० किलो खाकऱ्यांचे उत्पादन घेणाऱ्या या व्यवसायाची वार्षिक उलाढाल आज २० लाख रुपयांच्या घरात पोहोचली आहे. या आर्थिक यशामुळे प्रियंका बेरड आज अभिमानाने लखपती दीदी म्हणून ओळखल्या जातात. ग्रामीण भागातील महिलांना योग्य संधी, प्रशिक्षण आणि आर्थिक पाठबळ मिळाले, तर त्या केवळ कुटुंबाचाच नव्हे, तर गावाचा आणि राज्याचा आर्थिक कायापालट करू शकतात, हे बेरड यांनी सिद्ध केले आहे.

> प्रियंका बेरड यांनी १७ ऑक्टोबर २०१७ रोजी विहान महिला स्वयंसहाय्यता समूहाची स्थापना केली. त्यांना मळगंगा महिला ग्रामसंघ आणि शिवबा महिला प्रभागसंघाचे भक्कम पाठबळ लाभले. व्यवसाय विस्तारासाठी भांडवलाची गरज असताना, उमेद अभियानाने त्यांना मोलाचा हातभार लावला.

# हिवरेबाजार एकता, अभिमान आणि प्रेरणेचे प्रतीक- कर्नल प्रसाद मिजार

**नगर तालुका । रयत समाचार**

१७ महाराष्ट्र बटालियन नॅशनल कॅडेट कॉर्प्स () यांच्या वतीने आयोजित एक भारत श्रेष्ठ भारत () शिबिराअंतर्गत तामिळनाडू, पुद्दुचेरी (पाँडेचारी), अंदमान व निकोबार येथील एनसीसी कॅडेट्सनी १२ व १३ डिसेंबर रोजी आदर्शगाव हिवरेबाजार येथे अभ्यासभेट दिली.



यावेळी मार्गदर्शन करताना कर्नल प्रसाद मिजार यांनी हिवरेबाजार विकास मॉडेलचे महत्त्व अधोरेखित केले. जलसंधारण, पाणलोट विकास, वृक्षारोपण, मृदासंधारण, आपत्ती व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन आणि पाण्याचा ताळेबंद यांसारख्या उपक्रमांमुळे हिवरेबाजारने देशाला दिशादर्शक ठरेल असा आदर्श उभा केला असल्याचे त्यांनी नमूद केले. शिबिरातून कॅडेट्समध्ये प्रेरणा, शिस्त, देशप्रेम, तसेच पर्यावरण संरक्षण, श्रमप्रतिष्ठा, नेतृत्व, संघकार्य, आत्मविश्वास, आत्मनिर्भरता आणि राष्ट्रवाद या मूल्यांची जोपासना होईल, असेही ते म्हणाले.

या शिबिरामुळे विविध राज्यांतील कॅडेट्समध्ये राष्ट्रीय एकात्मता दृढ होऊन त्यांचा दृष्टिकोन व्यापक होईल आणि अनुभव अधिक समृद्ध होतील. त्यामुळेच हिवरेबाजार हे एकता, अभिमान आणि प्रेरणेचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन कर्नल मिजार यांनी केले.

भेटीदरम्यान पद्मश्री डॉ. पोपट पवार, सरपंच विमलताई ठाणगे, एस. टी. पादीर, जेसीओ सुभेदार यशवंत सिंग, ए.एन.ओ. भरत होळकर, मंगेश ठाणगे, राज ठाणगे, नंदकुमार झावरे तसेच पी.आय. स्टाफ उपस्थित होते.

# केंद्रस्तरीय गुणदर्शन स्पर्धेत नायगाव शाळेचे यश

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

गोंडेगाव येथे केंद्रस्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नायगाव जुने येथील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले. विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण करत शाळेचा नावलौकिक वाढवला.



हस्ताक्षर स्पर्धेत किलबिल गटात रोहित विश्वंभर दातीर याने प्रथम क्रमांक पटकावला, तर बालगटात वेद गंगाराम नजन याने प्रथम क्रमांक मिळवला. वेशभूषा सादरीकरण स्पर्धेत किलबिल गटात शौर्या सागर लहारे याने प्रथम क्रमांक मिळवला, तर बालगटात कैवल्य रवींद्र दरेकर व रुद्र शिवाजी लहारे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. वक्तृत्व स्पर्धेत किलबिल गटात आर्या सागर लहारे हिने प्रथम क्रमांक मिळवला, तर बालगटात आरोही किरण दातीर हिने द्वितीय क्रमांक पटकावला. वैयक्तिक गीत गायन स्पर्धेत किलबिल गटात श्लोक संतोष राशिनकर याने तृतीय क्रमांक, तर बालगटात श्रावणी निलेश लांडे हिने चतुर्थ क्रमांक मिळवला. कथा सादरीकरण स्पर्धेत बालगटात कैवल्य रवींद्र दरेकर याने द्वितीय क्रमांक पटकावला. सांस्कृतिक कार्यक्रमात शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ''सोशल मीडिया स्लो पॉयजन'' नाटकास तृतीय क्रमांक मिळाला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका रेहाना मुजावर शेख व मुख्याध्यापक शाकीर शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

यशाबद्दल केंद्रप्रमुख बाबासाहेब पिलगर, केंद्रसमन्वयक वाघुजी पटारे तसेच गटशिक्षणाधिकारी संजीवन दिवे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य, ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व सदस्य, गावातील तरुण मंडळे, संपूर्ण ग्रामस्थांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# बी.के.मॉडेल हायस्कूलचा शतक महोत्सव; सप्ताहभर भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

२ फेब्रुवारी १९२५ रोजी सात उत्साही तरुण शिक्षकांनी एका भाड्याच्या इमारतीत 'मॉडेल इंग्लिश स्कूल'ची स्थापना केली. बेळगावच्या सार्वजनिक जीवनातील सहा प्रमुख मार्गदर्शकांच्या प्रोत्साहनामुळे हा उपक्रम पुढे विस्तारला. डी. व्ही. बेळवी यांच्या अध्यक्षतेखाली बेळगाव एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली. १९४६ मध्ये तिची नोंदणी झाली.। संस्थेचा शतकमहोत्सव २० ते २६ डिसेंबरदरम्यान विविध कार्यक्रमांनी साजरा केला जाणार असल्याची माहिती अध्यक्ष अविनाश पोतदार यांनी दिली.ते म्हणाले, सुरुवातीची मॉडेल इंग्लिश मीडियम शाळा आज सात शैक्षणिक संस्थांमध्ये विस्तारली आहे. त्यामध्ये बी.के. मॉडेल हायस्कूल (१९२५), उषाताई गोगटे गर्ल्स हायस्कूल (१९६७),



एन.एस. पै प्री-प्रायमरी व प्रायमरी स्कूल (१९९२), वासुदेव घोटगे मॉडेल इंग्लिश मीडियम स्कूल (२००५), विठ्ठलाचार्य शिवणगी प्री-प्रायमरी व प्रायमरी स्कूल (२०१०), मॉडेल सायन्स अँड कॉमर्स पी.यू. कॉलेज (२०१३) आणि श्रीदेवी दासाप्पा शानभाग मॉडेल प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल (२०१६) यांचा समावेश आहे. विद्यार्थीसंख्या वाढल्यानंतर डी.व्ही. बेळवी यांनी पाटील गल्ली येथील इमारत व १.५ एकर जमीन संस्थेला दिली. प्रमोटर बळवंतराव दातार यांनी गृहमंत्री असताना बेळगाव कॅन्टोनमेंट येथील ३.७५ एकर संरक्षण विभागाची जमीन मिळवून देण्यासाठी मदत केली.शिक्षकांच्या सेवेमुळे विद्यार्थी आज आयएएस अधिकारी, वैज्ञानिक, शिक्षणतज्ज्ञ, उद्योजक, पोलीस व सरकारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. चार संस्थांमध्ये आजही कन्नड व मराठी माध्यमातून शिक्षण दिले जाते.महोत्सवासाठी खासदार शेट्टर, पालकमंत्री जारकीहोळी, लक्ष्मी हेंबाळकर व कृष्णा बायरेगौडा उपस्थित राहणार. यावेळी उपाध्यक्ष सुधीर कुलकर्णी, सहसचिव अरविंद हुनगुंद, समितीचे अध्यक्ष कृष्णकुमार पै, सचिव शैला चाटे, सहसचिव रवी घाटगे, मुख्याध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

> १९ डिसेंबर रोजी गंगावती प्राणेश यांचा विनोदी कार्यक्रम, २० डिसेंबर रोजी प्रभात फेरी व सायंकाळी खासदार तेजस्वी सूर्या यांच्या उपस्थितीत उद्घाटन, २१ डिसेंबर रोजी माजी विद्यार्थ्यांचा पुनर्मिलन समारंभ (केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी प्रमुख अतिथी), २३ डिसेंबर रोजी बॉडीबिल्डिंग शो व संगीत कार्यक्रम, २४ डिसेंबर रोजी सचिन पिळगावकर, २५ डिसेंबर रोजी डॉ. गिरीश ओक आणि २६ डिसेंबर रोजी नागतीहळी चंद्रशेखर यांच्या उपस्थितीत समारोप.

# प्रलंबित मागण्यांसाठी अखिल कर्नाटक चर्मकार महासभेचे धरणे आंदोलन

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

अखिल कर्नाटक चर्मकार महासभेच्या वतीने मंगळवार, ता. १६ रोजी सुवर्णसौध नजीक धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. चर्मकार समाज व चर्मकार उद्योगाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे.

चर्मकार समाजाच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या लीडकर महामंडळामध्ये समाजाला योग्य प्रतिनिधित्व देण्यात आलेले नाही. या महामंडळाच्या चेअरमन किंवा संचालक पदावर समाजातील कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यात आलेली नसल्याचा आरोप महासभेने केला आहे. तसेच शासनाच्या वतीने चर्मकारांना लघुउद्योगांतर्गत व्यवसायासाठी लीडकर शेड उपलब्ध करून दिल्या जातात. मात्र अनेक गरीब चर्मकार रस्त्याच्या कडेला शेड स्वरूपात आपला व्यवसाय सुरू करतात, परंतु यासाठी महापालिकेकडून परवाना दिला जात नाही. त्यामुळे महापालिकेच्या कारवाईची टांगती तलवार गरीब चर्मकारांवर कायम असते.

रस्त्याच्या कडेला ऊन, पाऊस व धुळीच्या वातावरणात व्यवसाय करावा लागत असल्याने गरीब चर्मकारांना विविध आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अनेकांचा अकाली मृत्यू होत असून त्याची दखल घेतली जात नसल्याची भावना महासभेने व्यक्त केली आहे.